गतिमान शिक्षणातून समाज परिवर्तन



भारती विद्यापीठाचे

# डॉ.पतंगराव कदम महाविद्यालय,सांगली

# संवाद - भारती

**A Tri - Monthly News Letter**

Oct-Dec :2016




संपादक मंडळ

अध्यक्ष : डॉ.डी.जी.कणसे

मुख्य संपादक : डॉ.संतोष माने

कार्यकारी संपादक :प्रा.अमोल वंडे

सदस्य:

डॉ.बी.डी.पाटील

प्रा.एम्.एच्.पाटील

संवाद भारती विशेष

# आर्थिक साक्षरतेला पर्याय नाही






**फायनान्शिअल लिटरसी म्हणजे आर्थिक साक्षरता ही एक अत्यंत महत्वाची अशी संकल्पना आपल्यात रुजण्याची फार आवश्यकता आहे. या मतावर कदाचित काहींचा 'इगो' दुखावला जाऊ शकतो. 'आता आम्हाला काय व्यवहारज्ञान पण येत नाही का' ? असा शेराही येऊ शकतो किंवा तरुण पिढीतील अनेक जण म्हणतील की, ज्ञानाचा महासागर आज एका 'क्लिक'वर आम्हाला उपलब्ध आहे. आम्हाला पाहिजे ते आम्ही सहज जाणून घेऊ शकतो.**

**अगदी खरं आहे गुंतवणुकीची अनेक साधनं, माध्यमं आज एका हाकेसरशी आपल्या जवळ आलेली आहेत. पण त्यामुळेच खरी समस्या निर्माण होते आहे. आजपासून ३०-३५ वर्षांपूर्वी अतिशय मर्यादित अशी गुंतवणुकीची साधनं उपलब्ध होती. जे माध्यम वडिलांनी वापरलं तेच मुलगा सुद्धा वापरायचा. पण आज परिस्थिती वेगळी आहे. गुंतवणुकीची अमर्याद साधने तुमच्या समोर उभी आहेत. नफ्याच्या टक्क्यात सुद्धा त्याने चांगली वाढ झाली आहे. यात वादच नाही. पण देशोधडीला लागलेल्यांचे प्रमाणही लक्षणीय आहे.**

नवीन पर्याय जसे जसे बाजारात उपलब्ध व्हायला लागले आहेत त्यासोबत खोट्या, फसव्या, ग्राहकांना लुबाडणाऱ्या अनेक कंपनी, लोकांनी यात शिरकाव केला आहे. यात अनेकदा आयुष्यभर मेहनतीने कमावलेल्या पैशाचा अपव्यय होतो आणि पश्चातापाची पाळी येते की, आपण हा विचार आधी का केला नाही ? या सगळ्यांकरिता आर्थिक साक्षरता वाढवणे ही काळाची गरज ठरते. आता यात आर्थिक साक्षरता म्हणजे बँकेचे व्यवहार करता येणे अथवा एखादी विमा पॉलिसी खरेदी केली असणे किंवा म्युच्युअल फंड, एसआयपी अशा मोठ्या शब्दाची फक्त ओळख असणे हे अपेक्षितच नाही.

कायमची नोकरी किंवा नोकरी नंतर निधनापर्यंत पेन्शन असा कोणताही प्रकार आज फक्त स्वप्नात खरा होण्यासारखा झाला आहे. धंदा असल्यास विना स्पर्धा तो आज होऊच शकत नाही. या परिस्थितीत जर ही आर्थिक साक्षरता आपण अंगी बाणली नाही तर त्याचे घातक परिणाम आयुष्याच्या अनेक टप्प्यांवर भोगावे लागू शकतात.

यात आर्थिक साक्षरता म्हणजे काय तर चालू आर्थिक घडामोडींचा आढावा घेण्याची वाचण्याची सवय करणे. त्याबद्दल एखाद्या तज्ज्ञ व्यक्ती किंवा फॅमिली ॲडव्हायझर सोबत चर्चा करणे.

अनेक जण आज शेअर्स, म्युच्युअल फंड अथवा एखादी एसआयपी किंवा कमोडीटी यात स्वत: गुंतवणूक करत असतात. ती करताना त्या विभागाचा अभ्यास करण्याची सवय करा. म्युच्युअल फंड आहे तर तो कोणत्या सेक्टरमध्ये गुंतवणूक करणारा आहे, त्या सेक्टरला भविष्यात काय संधी आहे याची जुजबी माहिती करून घेणे. शेअर्स घेताना सर्वांचे ऐकावे पण तो घेताना त्या कंपनीची आर्थिक स्थिती काय? याची माहिती करून घेण्याची गरज आहे. तुमच्या कम्प्युटरवर एका क्लिकवर त्या कंपनीची कुंडली मिळू शकेल. ते पाहूनच त्याची खरेदी करणे.

येथे अनेकांना प्रश्न पडेल की, आम्हाला त्या विषयात रस नाही त्यामुळे आम्हाला ते जमणार नाही, मात्र आजच्या बाजाराची आर्थिक स्थिती बघता आर्थिक साक्षरता ही आपली 'चॉइस' नाही तर गरज आहे. कारण एखाद्या माणसाच्या आयुष्यातील जे महत्त्वाचे आर्थिक टप्पे असतात त्यात मुलांचे शिक्षण, लग्न, स्व:ताच्या निवृत्तीनंतरची सोय अशा अनेक जबाबदाऱ्या असतात. ज्याप्रमाणे आज अनेक संधी, प्लान्स समोर आहेत पण त्यात चुकीची गुंतवणूक होण्याचा सुद्धा मोठा धोका आहे. कारण महागाईच्या दराशी जुळवताना आधीच होणारी दमछाक आणि त्यातून जर चुकीचे आर्थिक निर्णय झाल्यास आयुष्यभरासाठी त्याची किंमत मोजावी लागू शकते.

आज अनेकदा आपल्याला कर्ज काढण्यावाचून पर्याय राहत नाही. आणि मुख्य म्हणजे ते कर्ज देणाऱ्या संस्था सुद्धा लगेच बाजूलाच उभ्या असतात. अगदी सहजरीत्या ते कर्ज आपल्याला उपलब्ध सुद्धा करून देतात. इथे नेमकी आर्थिक साक्षरतेची गरज असते. यात अनेकदा छुपे खर्च समाविष्ट असतात. दर्शनी व्याजाचा दर हा कमी असतो पण प्रोसेसिंग खर्च भरमसाट असतो. तर कधी फोरक्लोसिंग चार्जेस खूप जास्त असतात. आपल्या गरजेच्या तीव्रतेत आपण त्याकडे दुर्लक्ष करतो. इथे या सगळ्या बाबीची माहिती करून घेणे म्हणजेच आर्थिक साक्षरता होय. कारण मला माहीत नव्हते हा प्रश्नच इथे येत नाही. १०० अटींच्या कागदावर तुमच्या २०० सह्या त्यांनी आधीच घेतल्या असतात. आणि त्याचा अर्थ तुम्ही ते वाचलं आहे असा होत असतो.

गुंतवणुकीची विचारपूस करिता येणाऱ्या ७०% टक्के लोकांना अजूनही डीमॅट अकाऊंट म्हणजे काय? याचा नक्की अर्थ माहिती नाही असा अनुभव आहे. त्यात त्याचे स्व:तचे डीमॅट अकाऊंट आहे पण ते कोणीतरी ओळखीच्या मित्राने अथवा त्याच्या मित्राने जबरदस्ती काढलेलं आहे. बँकेच्याच अकाऊंट सारखे काहीतरी आहे. असाच अनेकांचा अजूनही समज आहे. आज कधी नव्हते तितकी अनेक चांगली साधनं आर्थिक उन्नतीसाठी उपलब्ध आहेत. पण त्यासाठी वर सांगितल्याप्रमाणे आर्थिक साक्षरता ही फार जरूरी आहे. आजच्या आर्थिक जगात ती एक अपरिहार्य बाब झाली आहे.

पुण्य नगरी

मंगळवार, ४ ऑक्टोबर २०१६

## युवा महोत्सवात कदम महाविद्यालयाचे यश

सांगली / प्रतिनिधी

शिवाजी विद्यापीठाच्या जिल्हास्तरीय युवा महोत्सवात डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धेत यश मिळविले. एकांकिका, समूहगान स्पर्धेत प्रथम तर लोककला स्पर्धेत द्वितीय क्रमांक

पुण्य नगरी

मंगळवार, १८ ऑक्टोबर २०१६



सांगली : वाचन प्रेरणा दिनानिमित्त बोलताना प्रा. वैजनाथ महाजन. बाजूस अजिंक्य कुंभार, प्राचार्य डॉ. डी. जी. कटणे, प्रा. एम. एच. पाटील, ग्रंथपाल प्रा. जे. डी. हाटकर, प्रा. यु. ए. देसाई.

## ग्रंथांच्या वाचनातूनच गुणवत्ता प्राप्ती

**प्रा. वैजनाथ महाजन**

सांगली / प्रतिनिधी

मानवी जीवनातील नाविन्य जाणून घेण्यासाठी व गुणवत्ता प्राप्त करण्यासाठी महाविद्यालयीन काळ अनमोल आहे. गुणवत्तेच्या जोरावर कोणत्याही क्षेत्रातील उच्च पदावर जाता येते. ही गुणवत्ता ग्रंथांच्या व पुस्तकाच्या समग्र वाचनातून प्राप्त होते, असे मत प्रा. वैजनाथ महाजन यांनी व्यक्त केले.

भारती विद्यापीठाचे डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयामध्ये भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त वाचन प्रेरणा दिन झाला.

आजच्या आधुनिकीकरणाच्या युगात विद्यार्थी परीक्षार्थी बनत चालला असल्यामुळे वाचन व आकलन यांचा अभाव निर्माण झाल्याचे दिसून येते. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या बुद्धीमत्तेचा विकास खुंटतो असे महाजन म्हणाले.

अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. डी. जी. कणसे, अजिंक्य कुंभार, प्रा. एम. एच. पाटील, प्रा. यु. ए. देसाई, ग्रंथपाल प्रा. कु. जे. डी. हाटकर उपस्थित होते. प्राचार्य डी. जी. कणसे यांनी गतिमान युगामध्ये व्हॉटस्अप, टिवटर, फेसबुक व मोबाईल आदी सोशल मिडियाच्या जगामध्ये विद्यार्थ्यांना वाचनाची गोडी निर्माण करावी लागेल. ज्ञानाधिष्ठीत समाज निर्मितीसाठी विद्यार्थ्यांनी महाविद्यालयीन ग्रंथाचा पुरेपुर उपयोग केला पाहिजे, असे मत व्यक्त केले. सूत्रसंचालन प्रा. बी पी. खडके, आभार डॉ. संतोष माने यांनी केले. प्रा. श्रीकृष्ण मोहिते, डॉ. ए. एस. सपकाळ, डॉ. संतोष माने आदी उपस्थित होते.

दक्षिण महाराष्ट्र केसरी

१५ ऑक्टोबर २०१६



कबड्डी स्पर्धेमध्ये भारती विद्यापीठाच्या डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयाने द्वितीय क्रमांक प्राप्त केला.

## डॉ. कदम महाविद्यालयाचे कबड्डी स्पर्धेत यश

सांगली : प्रतिनिधी

शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय कबड्डी स्पर्धेमध्ये भारती विद्यापीठाच्या डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयाने द्वितीय क्रमांक प्राप्त केला. कासेगाव येथे झालेल्या शिवाजी विद्यापीठाच्या आंतरविभागीय कबड्डी स्पर्धेत महाविद्यालयाच्या वतीने शुभम पाटील, संदीप यादव, सूरज शेवाळे, सदाशिव चुरी, ओंकार स्वामी, प्रदीप बंडगर, स्वप्नील बंडगर, तेजस चौगुले, सचिन पवार, विपुल सरगर, करण सातपुते, पवन कोळी यांनी खेळाचे उत्कृष्ट सादरीकरण केले. शुभम पाटील, संदीप यादव, सूरज शेवाळे, विपुल सरगर या खेळाडूंची विद्यापीठ अंतर्गत कबड्डी स्पर्धेमध्ये शिवाजी विद्यापीठ संघामध्ये निवड करण्यात आली आहे. प्राचार्य डॉ. डी. जी. कणसे, प्रा. पी. डी. जगदाळे, प्रा. रुपाली कांबळे, प्रा. स्मिता जगताप यांचे मार्गदर्शन मिळाले.

सकाळ

सांगली, शनिवार, १५ ऑक्टोबर २०१६

## पतंगराव कदम महाविद्यालयात व्यसनमुक्ती सप्ताह

**सांगली :** जिल्हा परिषद, समाज कल्याण विभागाच्या वतीने व्यसनमुक्ती सप्ताह डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयात साजरा करण्यात आला. अध्यक्षस्थानी जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी बी. एस. पाटील होते. डॉ. सुरेश पाटील यांनी विद्यार्थ्यांना व्यसनावर मार्गदर्शन केले. या वेळी प्रा. ए. के. सूर्यवंशी, प्रा. ए. एल. जाधव, प्रा. बी. पी. खडके, प्रा. एस. एस. पाटील, प्रा. सुलभा तांबडे, प्रा. ज्योती इंगवले आदी उपस्थित होते. प्रा. सूर्यकांत बुरुंग यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. श्रीकृष्ण मोहिते यांनी प्रास्ताविक केले. व्ही. आर. पाटील यांनी आभार मानले.

दैनिक ललकार १५/१०/२०१६



# शिवाजी विद्यापीठ मध्यवर्ती युवा महोत्सवात डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयाचे दैदिप्यमान यश

सांगली दि. १४ – 'जन्म आमचा डोबारांचा, आयुष्य आमचे कसरतीचे, हातावरच्या पोटापाई, चिमुरडी आमची नाचू दावी....' असं वास्तव असणाऱ्या डोंबारी समाजाचे ह्रदयाचे ठाव घेणाऱ्या सादरीकरणातून भारती विद्यापीठाचे डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयाने लोककलेत प्रथम क्रमांक प्राप्त करुन शिवाजी विद्यापीठाच्या मध्यवर्ती युवा महोत्सवात मोहोर उमटवून दैदिप्यमान यश प्राप्त केले.

रहिमतपूर येथील शंकरराव मोहिते पाटील महाविद्यालयात संपन्न झालेल्या शिवाजी विद्यापीठ ३६ व्या मध्यवर्ती युवा महोत्सवात डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयाने लोककला प्रकारात प्रथम क्रमांक प्राप्त करुन सरदार दादासाहेब माने लोककला फिरता चषक प्राप्त केला. याच युवा महोत्सवामध्ये प्रश्न मंजुषा प्रथम क्रमांक, सुगमगायन– व्दितीय क्रमांक, शास्त्रीय गायन – व्दितीय क्रमांक व लोकनृत्य प्रकारात उत्तेजनार्थ क्रमांक प्राप्त केला आहे. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी. जी. कणसे यांचे प्रोत्साहन सर्व यशस्वी कलाकारांना मिळाले.

डोंबारी लोकनृत्यामध्ये सुर्यवंशी संतोष, मानवर गजानन, शिंदे बबन, पाटील सुशांत, धन्याळ आनंद, पवार महेश, जाधव ऋषिके, कु. नरुटे काजल, कु. निर्मळे सुप्रिया, कु. कदम रक्षंदा आदी विद्यार्थ्यांनी केलेल्या दर्जेदार सादरीकरणाने उपस्थित रसिकांच्या मनाचा ठाव घेत प्रथम क्रमांक प्राप्त केला. या कलाप्रकाराला प्रेक्षकांनी विशेष दाद दिली. तर विद्या पाटील, अक्षय तिवडे व दादासाहेब बर्गे यांनी हजरजबाबीपणा दाखवून प्रश्नमंजुषामध्ये प्रथम क्रमांक मिळविला. तसेच संज्योती जगदाळे हिने सुगमगायन व शास्त्रीय गायनामध्ये उपस्थित रसिकांना मंत्रमुग्ध करुन व्दितीय क्रमांक प्राप्त केला. वारकरी संप्रदायाच्या दिंडी नृत्याला उपस्थित रसिकांनी टाळ्यांच्या गजरात भरभरुन साथ दिली.

यशस्वी कलाकार विद्यार्थ्यांना शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे, खासदार उदयनराजे भोसले, चित्रलेखा माने–कदम, विद्यार्थी कल्याणचे संचालक डॉ. बी.एम. गुरव, यांच्या शुभहस्ते फिरता चषक व प्रशस्तीपत्र देवून गुणगौरव केला.

विद्यार्थ्यांनी प्राप्त केलेल्या यशाबद्दल भारती विद्यापीठाचे संस्थापक डॉ. पतंगराव कदम, कार्यवाह डॉ. विश्वजीत कदम, विभागीय मानद संचालक डॉ. एन.एम. कदम, प्राचार्य डॉ. डी. जी. कणसे, सस्कृतीक विभागाच्या प्रमुख प्रा. सौ. प्रभा पाटील, प्रा. एम.एच. पाटील, प्रा. डॉ. बी. डी. पाटील, डॉ. संतोष माने, यांचेसहीत महाविद्यालयातील प्राध्यापक शिक्षकेतर सेवकांनी अभिनंदन केले.

महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. सौ. प्रभा पाटील, प्रा. संजय ठिगळे, प्रा. अंकुश सरगर, प्रा. सौ. रुपाली कांबळे, डॉ. नितीन गायकवाड, प्रा. प्रमोद जगताप त्याचबरोबर नृत्य दिग्दर्शक ओंकार रोकडे यांचे मार्गदर्शन लाभले.

पुण्य नगरी ▮गुरुवार, २७ ऑक्टोबर २०१६

# डी. जी. कणसे यांना राष्ट्रीय शिक्षक भूषण पुरस्कार जाहीर

सांगली / प्रतिनिधी

गोवा येथील शिक्षक विकास परिषदेचा २०१६-१७ चा राष्ट्रीय शिक्षक भूषण पुरस्कार भारती विद्यापीठाच्या डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी. जी. कणसे यांना जाहीर झाला आहे.



प्राचार्य डी. जी. कणसे

शिक्षक विकास परिषदेचे अध्यक्ष आर. व्ही. कुलकर्णी यांचे या पुरस्काराचे पत्र प्राचार्य कणसे यांना प्राप्त झाले. राष्ट्रीय विकास परिषदेच्यावतीने दि. ६ नोव्हेंबर २०१६ रोजी सांगलीत होणाऱ्या २२ वी राष्ट्रीय शैक्षणिक परिषदेत त्यांचा पुरस्कार देऊन गौरव करण्यात येणार आहे.

या कार्यक्रमास गोवा विधानसभेचे अध्यक्ष अनंत शेठ, जिल्हाधिकारी शेखर गायकवाड, अरविंद दीक्षित, डॉ. विजयकुमार शहा, डॉ. जयशंकर यादव, डॉ. दिवाकर गौर, डॉ. ललीता जोगड आदींच्या उपस्थितीमध्ये डॉ. कणसे यांना सन्मानित करण्यात येणार आहे.

भारती विद्यापीठाचे संस्थापक डॉ. पतंगराव कदम, कुलगुरु शिवाजीराव कदम, कार्यवाह विश्वजित कदम, विभागीय मानद संचालक एच. एम. कदम यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. कणसे यांनी संशोधन क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले आहे.

सकाळ TODAY शुक्रवार, ९ डिसेंबर २०१६

# मुलींनो, सक्षम व्हा, कणखर बना

## डॉ. दीपाली काळे : डॉ. कदम महाविद्यालयात विद्यार्थिनींशी संवाद

YOUNG INSPIRATORS NETWORK

सकाळ वृत्तसेवा

सांगली, ता. ८ : माया, ममता अन् वात्सल्य हे महिलेचं रूप आहे. आताच्या युगात महिलांवरील अत्याचारांचे प्रमाण वाढत आहे. तो थोपवण्यासाठी मुलींनीच संघटित होऊन स्वयंसिद्ध बनले पाहिजे. तरच अत्याचारावर पायबंद बसेल, असे प्रतिपादन पोलिस उपाधीक्षक डॉ. दीपाली काळे यांनी आज येथे केले.

सकाळ माध्यम समूहाच्या यंग इन्स्पिरेटर्स नेटवर्कतर्फे (यिन) सांगलीवाडीतील डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयात संवाद कार्यक्रम झाला. 'मुलींची सुरक्षितता' याविषयी डॉ. काळे यांनी मुक्त संवाद साधला. 'सकाळ'चे सहयोगी संपादक शेखर

पान २ वर »



सांगली : सांगलीवाडी येथील डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयात 'यिन'तर्फे झालेल्या संवाद कार्यक्रमात बोलताना पोलिस उपाधीक्षक डॉ. दीपाली काळे. व्यासपीठावर 'सकाळ'चे सहयोगी संपादक शेखर जोशी, डॉ. महेश काकडे, प्राचार्य डॉ. डी. जी. कणसे आदी.

### 'यिन' चळवळीचे कौतुक

उपाधीक्षक डॉ. काळे यांनी 'सकाळ'ने विद्यार्थ्यांसाठी उभारलेल्या 'यिन' चळवळीचे कौतुक केले. 'यिन'च्या माध्यमातून विधायक कामे होताहेत. तरुणाईने सहभागी व्हावे, असे आवाहन केले.

» पान १ वरून

जोशी, शिवाजी विद्यापीठाचे परीक्षा निरीक्षक डॉ. महेश काकडे यांची उपस्थिती होती. प्राचार्य डॉ. डी. जी. कणसे अध्यक्षस्थानी होते. डॉ. काळे म्हणाल्या, "समाजात महिलांचे स्थान उंचावत आहे. मात्र, खऱ्या अर्थाने सुरक्षित आहेत का? चौकटीतून कधी बाहेर पडलेत का? असे प्रश्न कायम आहेत. अत्याचाराचे प्रमाण वाढत आहे, ते थांबवण्याची जबाबदारी आपलीच. टीव्हीवर अनैतिकतेला नैतिकता म्हणून दाखवले जाते. त्याचा काहीसा परिणाम आपल्यावर झाला. मानसिकता बदला. चौकटीबद्ध न राहता वैचारिकता वाढवा. अन्यायाला त्याचवेळी प्रत्युत्तर देता आले तरच समाजात टिकाव लागेल. 'तुम नकाब में रहो...दुनिया औकात में रहेगी' हे वाक्य वापरण्याची गरज भासणार नाही. स्वतः स्वयंसिद्ध बना. तुम्हीच तुमचे मार्गदर्शक बना."

श्री. जोशी यांनी 'सकाळ' च्या उपक्रमांची माहिती दिली. 'यिन' ची चळवळ स्थापन करण्यामागचा हेतूही स्पष्ट केला. महिलांना स्वयंसिद्ध बनण्यात 'सकाळ' ची साथ राहील, अशी ग्वाही दिली. डॉ. काकडे, डॉ. कणसे यांची भाषणे झाली. त्यांनी उपक्रमांची माहिती दिली. गुणवत्तेचा चढता आलेख मांडला. 'यिन' चे समन्वयक विवेक पवार, प्रशांत जाधव, पौर्णिमा उपळावीकर, अमृता चोपडे, सुकन्या जोशी, तेजस्विनी पाटील, निकीता शिंदे, सायली देशमुख, अनुराधा बुर्ले, सुरेखा पवार यांनी संयोजन केले. प्रा. भारती

दैनिक ललकार
दि.२१/१०/२०१६ पान नं.१२

# विभागीय मैदानी क्रिडा स्पर्धेत डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयास सर्वसाधारण विजेतेपद

सांगली दि. २० - शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मधील सांगली विभागीय मैदानी क्रिडा स्पर्धेमध्ये भारती विद्यापीठाच्या डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयाने सांघिक सर्वसाधारण विजेतेपद मिळवून घवघवीत यश प्राप्त केले आहे. सदर स्पर्धा मिरज येथील क्रीडा संकुलामध्ये संपन्न झाल्या. या स्पर्धेत महाविद्यालयाच्यावतीने १०० मी., २०० मी, ४०० मी., १५०० मी. पोलव्हॉल्ट, ल उंचउडी, भालाफेक ४ - १०० रिले. ४ - ४०० रिले आदी क्रिडा प्रकारामध्ये विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग घेऊन आपल्या क्रिडा कौशल्याच्या जोरावरती विभागीय मैदानी क्रिडा स्पर्धेत ६० गुणांची आघाडी घेत महाविद्यालयास सर्वसाधारण विजेतेपद प्राप्त करुन दिले. यामध्ये



उत्तम पाटील व खेळाडूने उत्कृष्ट खेळाडू व वेगवान धावपटूंचा मान मिळविला. त्याचबरोबर आर्यदिप लोंढे, पवन घोडके, अमर घोडके, रिलेश मुंगले व शुभम सावंत या खेळाडूंनी विविध प्रकारच्या मैदानी स्पर्धेमध्ये यश मिळविले.


या सर्व यशस्वी खेळाडूंना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी. जी. कणसे यांचे प्रोत्साहन तर प्रा. पद्माकर जगदाळे, प्रा. स्मिता जगताप व प्रा. कु. रुपाली कांबळे यांचे अनमोल मार्गदर्शन लाभले. सर्वसाधारण विजेतेपद प्राप्त करुन महाविद्यालयाच्या यशामध्ये आणखी एक मानाचा तुरा खोवल्याबद्दल भारती विद्यापीठ मानद संचालक डॉ. एच. एम. कदम, प्राचार्य डॉ. डी. जी. कणसे, डॉ. बी. डी. पाटील, प्रा. एम.एच. पाटील, प्रा. पद्माकर जगदाळे, प्रा. स्मिता जगताप व प्रा. कु. रुपाली कांबळे यांचेसहित सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी अभिनंदन केले व आंतरविभागीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

दैनिक ललकार
दि.२१/११/२०१६ पान नं.१२

# लोकहित जपणारे उत्तम प्रशासक-डॉ.एच.एम.कदम

घरातून बालपणापासून होणारे संस्कार हेच प्रत्येकाला यशस्वी जीवनाचे मार्ग दाखवीत असतात. कष्ट, मेहनत, जिद्द आणि सचोटी या चतुःसूत्रीचा आधार घेऊन अंगभर सोन्यापेक्षा डोक्यात सोन्यासारखे विचार घेऊन आपल्या कृतीला चिरकाल टिकणारे सौंदर्य प्राप्त करणारे काही व्यक्तिमत्व समाजामध्ये असतात त्यामध्ये वैद्यकीय, शैक्षणिक, सांस्कृतिक क्षेत्राला नवी दिशा देणारे व कर्तव्य दक्ष नियोजनापुढे अगदी मनापासून समर्पित व्हावे असे व्यक्तिमत्व म्हणजे भारती विद्यापीठ विभागीय मानद संचालक डॉ. एच.एम. कदम (सर ) हे होय आज कदमसरांच्या वाढदिवसानिमित्त शब्द सुमनांची शुभेच्छा. जनता व सेवक यांच्यामध्ये उत्तम संवाद, लोककल्याणासाठी विविध धोरणे आखून त्याची प्रभावी अंमलबजावणी वडीलधाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण करीत डॉ.कदमसरांनी आपल्या कर्तृत्वाची उत्तम छबी निर्माण केलेली आज आपणास पाहावयास मिळते. बोलण्यापेक्षा कर्तत्वाला महत्व देऊन जास्तीत जास्त वेळ आपल्या कार्यालयात उपस्थित राहून प्रशासनातील अडचणी सोडवून सर्व सामान्य जनतेशी सुसंवाद साधत भारती विद्यापीठाचे संस्थापक डॉ. पतंगराव कदमसाहेब, कुलगुरू डॉ. शिवाजीराव कदम सर व सोनहिरा कारखान्याचे अध्यक्ष श्री. मोहनराव कदम यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. एच.एम. कदम यांनी लोकहिताचे स्तुत्य पाहुल उचलेले आहे.

वडील मोहनराव कदम आई यशोदा कदम व काका आदरणीय डॉ. पतंगराव कदमसाहेब, कुलगुरू डॉ. शिवाजीराव कदम सर यांचे लहान पणापासून लाभलेले संस्कार, शिस्तीचे बाळकडू, त्याचबरोबर शिक्षणाबरोबर लाभलेले सामाजिक संवेदनांची जाणीव हि शिदोरी घेऊन डॉ. एच.एम. कदम यांनी आपली कर्तृत्वाची शिखरे पादाक्रांत केली आहे. आपले प्राथमिक शिक्षण सोनसळी या गावी तर पुणे येथे शंकरराव मोरे विद्यालयात हायस्कूलचे शिक्षण पूर्ण करून डॉ. कदम यांनी पुणे विद्यापीठाची बी.फार्म. व एम. फार्म. पदवी पूर्ण केली. शिक्षण क्षेत्रातील विद्यावाचस्पती हि उच्च पदवी पुणे विद्यापीठातून पूर्ण केल्यानंतर भारती विद्यापीठाच्या इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी मध्ये ला डॉ. कदम यांनी प्राध्यापक म्हणून शैक्षणिक कार्यास सुरुवात केली. पासून इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी मध्ये प्राचार्य पदाची धुरा संभाळत वैधकीय क्षेत्रातील प्रशासनात



आपली अमिट छाप निर्माण केली.

भारती विद्यापीठाचे संस्थापक डॉ. पतंगराव कदमसाहेब, कुलगुरू डॉ. शिवाजीराव कदम सर व सोनहिरा कारखान्याचे अध्यक्ष श्री. मोहनराव कदम यांच्या सारख्या कर्तृत्वान माणसाचं सौहात पूर्ण मार्गदर्शनाचे कवच डॉ. एच.एम. कदम सरांना प्राप्त झाले असल्यामुळे सन सालापासून सांगलीतील भारती विद्यापीठ विभागाचे मानद संचालक म्हणून गेले वर्ष कार्यरत आहेत. भारती वैद्यकीय महाविद्यालय व हॉस्पिटलच्या माध्यमातून गोरगरिबांना उत्तम आरोग्य सेवा देण्याची त्यांनी प्रेयत्न केला आहे. दूरदृष्टी व नाविन्यपूर्ण विधायक उपक्रमांच्या अंमलबजावणी मुळे भारती विद्यापीठाने सांगली जिल्यात वैद्यकीय क्षेत्रात प्रगतीचे नवे पर्व डॉ. एच.एम.कदम यांच्या अनमोल मार्गदर्शनाखाली सुरु झाले आहे. ससंस्कृत विचारांचा वारसा व विकासाची दृष्टी डॉ. एच.एम.कदम याना लाभलेली आहे. विज्ञान तंत्रज्ञानांतील कमालीची रुची आधुनिक कल्पक दृष्टी व उच्च विद्या विभूषित म्हणून डॉ. कदम यांची प्रतिमा सर्वसामान्यांपासून ते उच्च सुशिक्षितांमध्ये निर्माण झालेले आहे. प्रसन्न व्यक्तिमत्व, स्वच्छ पोषक, विषयाचा सखोल अभ्यास, उत्कृष्ठ नियोजन सातत्याने काम करण्याची वृत्ती व शिस्त या सर्वांगीण गुणांच्या मिलनाने डॉ. एच.एम.कदम यांनी आपल्या कर्तव्याशी प्रामाणिक राहून वैद्यकीय क्षेत्रात जी सेवा केली आहे. त्याला तोडच नाही. वैद्यकीय क्षेत्रातील अखिल भारतीय फार्मसी शिक्षक संगठना, इंडियन सोसायटी फॉर टेकनिकल एजुकेशन, इंडियन फार्मास्युटिकल असोसिअन व इंडियन सोसायटी फॉर क्लिनिकल फार्माकॉलॉजि आदी संस्थावरती डॉ. एच.एम.कदम कार्यरत असून संशोधन क्षेत्रामध्ये हुन अधिक शोधनिबंध आंतरराष्ट्रीय नियतकालिकात प्रसिद्ध केलेली आहेत. त्यांच्या या कार्याची नोंद घेऊन पुणे महानगर पालिकेने आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन त्यांना गौरविले आहे. उत्तम संघटक व उपक्रमशीलता हा त्यांचा स्थायीभाव असल्यामुळे कडेगाव येथील मातोश्री बयाबाई कदम कन्या महाविद्यालय व सांगलीतील डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयास राष्ट्रीय मूल्यांकन समितीचे अ श्रेणी मिळवण्यासाठी डॉ. एच.एम.कदम यांनी उत्तम प्रशासकीय भूमिका बजावली होती. सांगली, कोल्हापूर, सातारा जिल्यातील भारती विद्यापीठ संलग्न असणाऱ्या विविध शाखा डॉ. एच.एम.कदम यांच्या अनमोल मार्गदर्शनखली कार्यरत आहेत. आपण आजपर्यंत ज्या ज्या शाखेत सेवा दिलीत आणि आजही देत आहात तिथं विद्यार्थी, शिक्षक, सेवक यांची काळजी घेता आणि हे कार्य करत असताना संस्थेबद्दलचा आदर आपल्या मनामध्ये कृतीद्वारे वेळोवेळी प्रकट होत असताना सर्वांना दिसतो.

आपल्या प्रगतीची मशाल अशीच तेवत राहो अथक परिश्रमाने व संयमाने इथून पुढचा भविष्याचा वेग आपण काबीज करावा व आपल्या हातून वैद्यकीय क्षेत्रामध्ये दीपस्तम्बसारखे अनमोल कार्य घडावे याकरिता आपणास हार्दिक शुभेच्छा.

प्राचार्य डॉ. डी. जी.कणसे
भारती विद्यापीठाचे
डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय,
सांगली

पुण्य नगरी
गुरुवार, २९ डिसेंबर २०१६



सांगली : दीपप्रज्वलन करुन महोत्सवाचे उद्घाटन करताना डॉ. डी. आर. मोरे, डॉ. एच. एम. कदम, प्राचार्य डॉ. डी. जी. कणसे आदी.

# राष्ट्रीय उत्पन्नवाढीसाठी संशोधनात्मक शिक्षणाची गरज

## डॉ. डी. आर. मोरे

**सांगली / प्रतिनिधी**

भारतीय शिक्षण पद्धतीत संख्यात्मक वाढ झाली आहे, मात्र गुणात्मक वाढ त्या तुलनेत कमी झाली आहे. गुणवत्ता सिद्ध करुन राष्ट्रीय उत्पन्नवाढीसाठी संशोधनात्मक शिक्षणाची गरज आहे, असे मत शिवाजी विद्यापीठाचे संचालक प्राचार्य डॉ. डी. आर. मोरे यांनी व्यक्त केले.

डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयात आयोजित अविष्कार संशोधन महोत्सवाच्या उद्‌घाटनप्रसंगी ते बोलत होते. ते म्हणाले, भारतामध्ये ७९० विद्यापीठ असूनही गुणात्मक वाढ म्हणावी तशी झाली नाही. आपल्याला जागतिक क्रमवारीत येण्यासाठी प्रगतशील संशोधनाचा ध्यास घेतला पाहिजे.

प्राचार्य डॉ. डी. जी. कणसे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. यावेळी त्यांनी महाविद्यालयातील नाविण्यपूर्ण उपक्रमांची माहिती दिली. अध्यक्षस्थानी भारती विद्यापीठाचे मानद संचालक डॉ. एच. एम. कदम होते.

यावेळी प्राचार्य डॉ. डी. जी. कणसे, डॉ. ए. एम. गुरव, डॉ. पी. एन. भोसले, डॉ. आर. जी. कुलकर्णी, डॉ. बी. डी. पाटील, प्रा. एम. एच. पाटील, प्रा. श्रीकृष्ण मोहिते, डॉ. विकास आवळे, डॉ. संतोष माने आदींसह मान्यवर उपस्थित होते. प्रा. सूर्यकांत बुरुंग यांनी सूत्रसंचालन केले.

दैनिक जनप्रवास
गुरुवार, दि.२९ डिसेंबर २०१६

# स्पर्धेच्या युगात आयुर्विमा क्षेत्रात रोजगाराच्या अनेक संधी : महेश कुलकर्णी



डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयातील व्यवसाय अभ्यासक्रमांतर्गत उद्योजकता व व्यक्तिमत्व विकास विषयावर मार्गदर्शन करताना महेश कुलकर्णी. प्राचार्य डॉ. डी.जी.कणसे व मान्यवर उपस्थित होते.

**सांगली ■ प्रतिनिधी**

उच्च माध्यमिक व महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण केल्यानंतर विद्यार्थ्यांनी आयुर्विमा क्षेत्रामध्ये रोजगाराच्या अनेक संधी उपलब्ध आहेत. स्पर्धा परीक्षेबरोबरच या प्रकारच्या रोजगाराची तयारी विद्यार्थिनी करावी, असे प्रतिपादन आयुर्विमा क्षेत्रातील सहाय्यक व्यवस्थापक महेश कुलकर्णी यांनी केले.

भारती विद्यापीठाचे डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयातील व्यवसाय अभ्यासक्रमांतर्गत उद्योजकता व व्यक्तिमत्व विकास या विषयावर ते बोलत होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी.जी. कणसे उपस्थित होते. यावेळी विभागप्रमुख डॉ.ए.एस. सपकाळ, उपप्राचार्य डॉ. बी.डी. पाटील, बँकींग विभागाचे प्रा. विजय पाटील उपस्थित होते. महाविद्यालयात शिक्षण घेत असताना विद्यार्थ्यांनी ज्ञानदानाबरोबरच विविध कौशल्ये विकसित करावीत. भविष्याची वाटचाल करताना येणाऱ्या स्पर्धेत यशस्वी होण्यासाठी विद्यार्थ्यांनी ध्येय निश्चित करावे. आयुर्विमा क्षेत्रात वाढत्या लोकसंख्येप्रमाणे करिअरच्या अनेक नवनवीन संधी उपलब्ध आहे. विद्यार्थिनी या क्षेत्रात करिअर करण्यासाठी स्पर्धा परीक्षेची तयारी करून यशस्वी व्हावे, आयुर्विमा क्षेत्रात सर्व परीक्षा या पारदर्शक असल्यामुळे विद्यार्थ्यांनी या क्षेत्रात सर्वांग अभ्यास करून नियोजन केल्यास आयुर्विमा क्षेत्रात मानवी जीवनाला सुवर्णसंधी आहे, असे महेश कुलकर्णी यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक व्यवसाय शिक्षण विभागप्रमुख डॉ.ए.एस.सपकाळ यांनी केले. पी.ए. केंगार यांनी आभार मानले. प्रा.एस.जे. पाटील यांनी सूत्रसंचालन केले.

पुण्य नगरी
सोमवार, १२ डिसेंबर २०१६

# विद्यार्थ्यांचे मानसशास्त्र जाणून विद्यादान करावे

## अरुण अडसूळ

**सांगली / प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांचे मानसशास्त्र जाणून विद्यादान केल्यास राष्ट्राचा विकास तर होतोच, त्याचप्रमाणे संस्थेचा, विद्यार्थ्यांचा व स्वतःचा विकास होत असतो याची जाणीव शिक्षकांनी ठेवावी. आंतरमनाने शिक्षण क्षेत्रात प्राध्यापकांनी कार्य, संस्कृती जोपासली तर प्रगतशील समाज निर्माण होईल, असे प्रतिपादन सावित्रीबाई फुले विद्यापीठ, पुणेचे माजी कुलगुरु डॉ. अरुण अडसूळ यांनी केले.

येथील भारती विद्यापीठाचे डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयात सदिच्छा भेटीप्रसंगी प्राध्यापकांशी या उपक्रमांतर्गत ते बोलत होते. यावेळी प्राचार्य डॉ. डी. जी. कणसे, डॉ. बी. डी. पाटील, प्रा. एम. एच. पाटील,



सांगली : माजी कुलगुरु डॉ. अरुण अडसूळ यांचा सत्कार करताना प्राचार्य डॉ. डी. जी. कणसे.

प्रा. पी. डी. जगदाळे उपस्थित होते. प्राध्यापकांशी संवाद साधताना डॉ. अरुण अडसूळ म्हणाले, समाज उन्नतीचे व समाज प्रबोधनाचे कार्य प्राध्यापक विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व घडवणीतून देत असतात.

विद्यार्थी, प्राचार्य, संस्थापक यांच्याशी सुसंवाद साधत बेकारी व बेरोजगारी नाहिशी करण्यासाठी व येणाऱ्या उज्ज्वल भविष्यासाठी प्राध्यापकांनी कृतीशिल योगदान द्यावे. यातूनच समर्थ व सामर्थ्यवान विद्यार्थी बनविण्याचे कार्य प्राध्यापकांनी सकारात्मक दृष्टीकोन ठेवून केल्यास येणारा भविष्यकाळ तेजोमय आहे.

प्राचार्य डॉ. डी. जी. कणसे यांनी भारती विद्यापीठ व डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयाच्या गौरवशाली प्रगतीचा आढावा यावेळी घेतला. यावेळी प्रा. एस. डी. ठिगळे यांनी मनोगत व्यक्त केले. प्रा. पी. डी. जगदाळे यांनी आभार मानले. डॉ. अरुण अडसूळ यांनी महाविद्यालयातील ग्रंथालय, परीक्षा विभाग व इतर विभागांना प्रत्यक्ष भेट दिली.